Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# आंबेडकरी विचाराला वाहिलेले काव्यपुष्प"क्रांतिपर्व"

**डॉ. लहू दिगंबर वाघमारे**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव.

कवी लहू कानडे हे वर्तमान काळातील धडाडीचे आंबेडकरवादी कवी आहेत. कविता हा वाड्मय प्रकार स्वतःमध्ये मुरवून त्याचा स्वतःमध्ये विकास घडवून अत्यंत अंतर्मुखतेने व तेवढ्यात संवेदनशीलतेने हा प्रकार त्यांनी हाताळला. आपल्यातील काव्यप्रतिभा सुसंस्कारित व वृद्धिंगत करण्यासाठी त्यांनी अनेक काव्यसंग्रह वाचले पदवीचे शिक्षण इंग्रजीतून घेत असताना त्यांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांतील कवितांचे वाचन केले. त्यातून त्यांची सर्जनशीलता विकसित होत गेली.

त्यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली महाविद्यालयाच्या भिंती पत्रकात आणि वार्षिकांकात या छापून आल्या. परंपरागत असलेले अठराविश्व दारिद्रय घेऊन जगणारा हा कवी पदव्युत्तर शिक्षणासाठी औरंगाबादला आल्यावर त्यांच्या लेखनाला कलाटणी मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी भारावलेल्या आणि पुनीत झालेल्या नागसेनवन परिसराच्या सानिध्यात ते भारावून गेले. दलित युवक आघाडीतील काही कार्यकर्त्यांशी त्यांची ओळख झाली व ते चळवळीकडे ओढले गेले. आंबेडकरांच्या विचारांची त्यांना ओळख झाली व या दृष्टीने त्यांचे चिंतन सुरू झाले आणि त्यांचा पिंड एका चळवळीतील विचारवंत कार्यकर्त्यांचा पिंड झाला. त्यांच्या कवितांना विचारांची आणि अनुभूतीची जोड आहे अत्यंत खडतर परिस्थितीवर मात करीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले व प्रशासनातल्या मोठ्या पदापर्यंत पोहोचले. त्यानंतर तर त्यांच्या काव्यप्रतिभेचा उत्तरोत्तर विकास होत गेला. अधिकारी म्हणून कार्य करताना ते अत्यंत कर्तव्यदक्ष व सक्षमपणे त्यांनी केले. ग्रामीण व उपेक्षित माणसाबद्दल त्यांना तळमळ होती. म्हणूनच त्यांनी ग्रामीण विकासाच्या विविध योजना तेवढ्याच तळमळीने राबविल्या होत्या. "हागणदारी मुक्त गाव" या मोहिमेचेही ते जनक होते.ते समाजकार्यात कृतिशील व अग्रेसर असलेले एक धडाडीचे कार्यकर्ते होते. अधिकारी म्हणून कार्यमग्न असतानाही त्यांनी आपल्यातील काव्यात्मकतेला विरु दिले नाही.तर त्यांनी कवितेची सेवा अविरतपणे केली. त्यांचा 'क्रांतीपर्व' हा पहिला कवितासंग्रह 1983 साली प्रकाशित झाला. 'टाचा टिभा' हा काव्यसंग्रह 1996- 97 साली प्रकाशित झाला. तर 'तळ ढवळताना' हा त्यांचा काव्यसंग्रह 2012 साली प्रकाशित झाला. त्यांच्या विविध काव्यसंग्रहातील कविता विविध शालेय व विद्यापीठातील अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या या सर्व कलाकृतीचा सन्मान म्हणून त्यांची 1997 साली नांदेड येथे संपन्न झालेल्या पहिल्या 'बहुजन साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. त्यांच्या उपरोक्त काव्यसंग्रहातील 'क्रांतिपर्व' या काव्यसंग्रहातील सर्व कवितांच्या आधारे त्यांच्या काव्यलेखनातील विशेष्यांचा व मूल्यांचा शोध या शोधनिबंधात घेण्यात येणार आहे. साधारणतः 1983 साली त्यांना या काव्यसंग्रहासाठी साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त झाले. त्यानंतर त्यांची2010 मध्ये दुसरी सुधारित आवृत्ती निघाली. एकूण 74 कविता असलेल्या या काव्यसंग्रहातून कवी लहू कानडे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कर्तृत्वाने मिळालेल्या सर्व जगण्याचे श्रेय ते या काव्यसंग्रहातून मानतात त्याचवेळी भारतीय समाजव्यवस्थेतील मनु प्रणित विषम व्यवस्थेने दिलेल्या वेदनांचे जिवंत रूपही ते मांडतात ही वेदना आपल्या उरात कवठाळून निमूटपणे जीवन कंठणाऱ्या येथील सामान्य माणसांचे वेदनामय जगणे व त्या वेदने विरुद्धचा विद्रोहही तेवढ्याच भक्कमपणे मांडतात त्यांचे व्यक्तिमत्त्व बाबासाहेबांच्या संघर्षशील विचारांने भारावून गेले

आहे.त्यांचीच प्रेरणा त्यांच्या काव्यलेखनाला लाभलेली आहे बाबासाहेबांच्या चरित्राचे, कार्याचे व विचारांचे काव्यात्मक चित्रण करताना त्यांच्या लेखणीला स्फुरण चढते. 'तो फकीर सांगून गेला या कवितेत ते लिहितात तो फकीर सूर्य होता आपल्यासाठी अंधार पिलांनो तो फकीर शौर्य होता आपल्यासाठी अंधार पिलांनो खौवून माथ्यात तारे चालण्याला तो फकीर सांगून गेला

बाबासाहेबांच्या धीरगंभीर व्यक्तिमत्वाचे हे जिवंत चित्रण येथे अत्यंत जिवंतपणे व्यक्त झाले आहे बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजबांधवांना स्वाभिमानाची शिकवण दिली. गुलामी फेकून द्यायला लावली . त्यांच्यातील स्वाभिमान जागृत केला. 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा ही परिवर्तनाची हाक त्यांना दिली. त्यामुळे कोट्यवधी अस्पृश्य, दलित, शोषित व पीडितांचे आत्मभान जागे झाले. 'पोटासाठी लाचार होण्यापेक्षा अंगार व्हाहे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान या अनुयायांनी आत्मीयतेने आत्मसात केले त्यामुळे त्यांच्या जीवनातील दु:ख दैन्य आणि दारिद्र्य संपले बाबासाहेबांनी आपल्या कोट्यवधी समाज बांधवांना पामरे समजून आपले आयुष्य त्यांच्यासाठीच समर्पित केले म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे या कोट्यावधी पामराची मायबाप होते. ते आपल्या लेकरांसाठी फकीर बनले होते त्यासाठी त्यांनी आपल्या संसाराचीआणि मुलाबाळांची कधीही पर्वा केली नाही. म्हणूनच कवीने त्यांना फकीर ही दिलेली उपमा अत्यंत समर्पक व सार्थ ठरली आहे हा देश म्हणजे जातिभेदाचा अग्निकुंड आहे. आंबेडकरी कवितेत या देशाला अनेक उपमा देण्यात आल्या आहेत. प्रसिद्ध कवी दया पवार यांनी या देशाला 'कोंडवाडा' म्हटले तर नामदेव ढसाळांनी त्याला 'बंदीशाळा' म्हटले. तोच परिवर्तनाचा वारसा जतन करत कवी लहू कानडे यांनीही या देशाला 'तुरुंग' आणि 'नरक' असे म्हटले आहे. या काव्यसंग्रहातील 'घरकुल' या कवितेमधून त्यांनी या विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेच्या देशाचे अत्यंत दाहक व जिवंत चित्रण त्यांनी केले आहे

वर्ण व्यवस्थेतील भेद नीतीच्या अपमानाने व्याकूळ झालेले कवीचे मन या जातीयतेच्या वेदनेतून मुक्त होण्यासाठी धडपडताना म्हणते .

सततच्या उन्हात करपलेले माझे आभाळ
काळेकुट्ट ढग होऊन कुडकुडत रडत आहे
बाहेर पडण्या तुरुंगातून् जाती जातीच्या
कोंडवाड्यातून
फोडून नरक भयंकर उजेडासाठीधडपडत आहे.

आपल्या वेदनांना कवीने दिलेली आभाळाची उपमा ही या देशातील अस्पर्श माणसांच्या मरणप्राय यातना व्यक्त करण्यासाठी अत्यंत अर्थपूर्ण ठरली आहे असीम आभाळासारखे अनादि व अनंत असलेले हे दु:ख पुरातन स्वरूपाचे आहे. त्याचे नाते संत चोखोबा आणि संत तुकाराम यांच्या वेदनेशी आहे. या देशातील समाज रचना ही मनुप्रप्रीत असून ती चातुर्वर्ण्य स्वरूपाची आहे येथील संत- महंतानाही त्याचा घोर अपमान सहन करावा लागला आहे. तरीही संत ज्ञानेश्वरांसारख्या संतानी 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' असे सांगून या वर्णव्यवस्थेचे समर्थन केले आहे. परंतु कवीचे मन मात्र या व्यवस्थेच्या विरोधात बंड करुन उठताना दिसते. 'तेव्हापासून' या कवितेतून या व्यवस्थेविरुद्ध युध्दासाठी सज्ज झालेले कवी लिहितात.

काळोखाच्या भोवऱ्यात बुडत बुडत जगताना
सूर्याचे कोंब पोटात फुटल्याचा फक्त भास झाला आणि
तेव्हापासून
आम्ही युद्ध जोपासतो आहोत अंधाराला निषेधत युगानुयुगे

या देशातील वर्णभेदाला कवीने अंधाराची दिलेली उपमा येथे अत्यंत औचित्यपूर्ण ठरली आहे

या विषमतेच्या अंधाराला नष्ट करून समानतेचा व न्याय हक्काचा सूर्य शोधणारा कवी आपल्या या न्याय हक्कासाठी युद्ध पुकारतो आहे. या विषमतेचा निषेध करतो आहे. जातीभेदाच्या या देशाला कवीने दिलेले हे आव्हान या देशाच्या विकासाला व समता निर्मितीला पूरक ठरणारी आहे

या देशाला नटविण्यासाठी खऱ्या अर्थाने येथील अस्पृश्यांनी अथक परिश्रम केले. येथील सवर्णांची सेवा त्यांनीच केली. येथील सवर्णांना सुख मिळवून दिले म्हणजे या देशाचे खरे सुधारक अस्पृश्यव दलितच आहेत हे कवींनी 'अधर्म करू

नये' या आपल्या कवितेत छातीठोकपणे सांगितले आहे. या देशाला व देशातील सर्व सवर्णांना मानसन्मान व सुखाचे जीवन बहाल केले ते अस्पृशानीच. हा सर्व इतिहास कवीने कवितेतून मार्मिकपणे सांगितलेला आहे.

स्वतःचे रक्त सांडून फकिरांनी गावासाठी जोगतीनी गावात आणल्या. त्यांच्या चपला विष्टेसह अस्पृशानींच शिवून दिल्या. त्यांची मेलेली गुरे अस्पृश्यांनीच ओढली त्यांचे मलमूत्र अस्पृश्यानीच डोक्यावरून वाहून नेलेत्यांचे कपडे अंतर्वस्त्रासह अस्पृश्य स्त्रियांनीच साफ केले समाजसेवेची सर्व कामे या देशातील अस्पृश्यानीच केली. तरीही सवर्ण व्यक्तीच आपण समाजकार्य केल्याची शेखी मिरवितात. तेच महात्मा ठरतात आणि या देशातील अस्पृश्यांच्या शोषितांच्या विकासाचा आव आणतात.

या देशाला सजविण्यासाठी व परकीयांच्या तावडीतून वाचविण्यासाठी येथील अस्पृश्यानी कष्ट उपसले;परंतु सत्तेत बसलेली सर्व सवर्ण मंडळी आपण दलित शोषितांसाठी खूप काही करत आहोत.असा आव आणत आहेत. संविधानाने दिलेले घटनादत्त अधिकार अस्पृश्यांना आपणच दिलेले आहेत. असे त्यांना वाटते. अशा स्वतःची पोळी भाजून घेणा-या स्वार्थी समाजसुधारकांच्या ढोंगीपणाचा समाचारही कवीने प्रस्तुत कवितेतून घेतलेला आहे संधीसाधू स्वार्थी अशा या ढोंगी समाजसुधारकांचा त्यांना भक्कम संरक्षण देणाऱ्या येथील हिंदू धर्म, त्यांची अध्यात्मिक ग्रंथसंपदा, त्यातील स्वर्ग नरक आणि पाप पुण्य या सर्वांचा समाचार घेत आपला स्वाभिमान प्रकट करताना ते लिहितात

आता तुम्ही आमच्यासाठी उगा कष्ट वेचू नये
आमचे आम्ही बघून घेऊ तुम्ही मध्ये नाचू नये.

वरवर या देशातील अस्पृश्य दलित आणि शोषितांच्या विकासाचे ढोंग करणाऱ्या परंतु वास्तवात त्यांचे सर्वांगीण शोषणच करणाऱ्या येथील सवर्ण ढोंगी, स्वार्थी व मतलबी पुढाऱ्यांचे अत्यंत वास्तव चित्रण कवीने केले आहे हे चित्र येथील आंबेडकरी अनुयायांना व स्वाभिमानी वाचकांना नवी प्रेरणा व दिशा देणारे ठरले आहे. विद्रोह हे आंबेडकरी कवितेचे जणू प्राणतत्त्वच आहे. या देशातील दलित शोषितांच्या व अस्पृश्यांच्या वाट्याला आलेली युगानुयुगाची वेदना सहन करता करता अस्पृश्यांच्या अनेक पिढ्या नेस्तनाबूत झाल्या. या वेदनेच्याविरुद्ध विद्रोह करण्याचे कार्य अनेक आंबेडकरी कवीने केले आहे. युगानुयुगे भाकरीसाठी लाचारी करणाऱ्या माणसाचा छळ करण्यात आला होता. या छळाची व्यथा प्रकट करताना कवी 'विद्रोह' या कवितेत लिहितात

जनावरांना पूजावं
देव म्हणून
देवा-यात न्यावं

माणसांना मात्र मांगीर म्हणून दारामध्ये जेवण द्यावं घरातील सर्वांच्या आधी कुटुंबाची भूतबाधा टळावी म्हणून माणसांनीच माणसांना खुशाल बळी द्यावं मनवतेच्याच आतड्यांना गळफास लावून स्वार्थाने जगण्यासाठी मुंगीला साखर घालणारी प्राण्यांमध्ये देव पाहणारी आणि माणसांना मात्र प्राण्या होऊनही तुच्छ समजून त्यांचा छळ करणारी ही संस्कृती भारताशिवाय जगाच्या इतिहासात शोधूनही मिळणार नाही. या देशातील सवर्णांनी आपल्या सुखासाठी येथील अस्पृश्य माणसाच्या आयुष्याचे मातेरे केले त्यांचा बळी दिला. हा माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार हजारो वर्षांपासून या देशात घडत आला आहे. मानवातल्या अमानुषतेची ही मोजदाद कवीने या कवितेतून केलेली आहे.

माणसाच्या या अमानुषतेला उबगलेल्या कवीमनाने अस्पृश्य माणसात रुजलेल्या महापुरुषाच्या अहिंसेचा व समतेचा ही वेध घेतलेला आहे .'एका अस्पृश्यांचे स्वप्न या कवितेत ते लिहितात

एका अस्पृश्यांचे स्वप्न मायेसाठी भुकेलेले
शस्त्राविना समतेसाठी

असे उभे टाकलेले संवेदनशील असलेला या देशातील अस्पर्श माणूस एका मायेसाठी आसुसलेला आहे. ज्याला या देशातील माणसाने धर्मातील पाप-पुण्याच्या स्वर्ग-नरकाच्या कपोलकल्पित समजुतीसाठी दूर ठेवले त्यांचे अस्तित्व नाकारले. तो माणूस मात्र बुद्धाची समता घेऊन सत्य, अहिंसा आणि प्रज्ञेवर आधारलेला समाज स्थापण्यासाठी निघालेला आहे

या देशातील फोल देव,धर्म, रूढी, परंपरा आणि पोथीपुराण यांनी येथील सामान्य माणसांचे जीवन पोखरून काढले आहे. जगात महान समजल्या जाणाऱ्या या भारतीय संस्कृतीचे कवी लहू कानडे यांनी वाभाडे काढले आहेत' कसे सांगावे' या कवितेत ते लिहितात संस्कृती म्हणून मिरविणाऱ्या या गोठ्यातील वैरणीच्या

उंच उंच गंजा

कत्तलखाने दंडवतच राहिल्या पोटातील

अनेक सोंग समजून

धर्माच्या नावाखाली

आणि माझ्या भाबडेपणावर असंख्य बलात्कार केले येथील रूढी-परंपरा आणि पोथी पुराणांनी

माणसाला धर्माची नितांत आवश्यकता आहे असे बाबासाहेबांनी म्हटले आहे परंतु हा धर्म निकोप सदाचारी आणि सत्वशील असला पाहिजे. तो जर वर्णवादी, विषमतावादी आणि अमाणुसतेची शिकवण देणारा असेल तर तो धर्म कसला? या देशातील हिंदू धर्माचे असेच झाले आहे धर्माचे अवडंबर माजवून त्या धर्माचे विषमताधिष्टित ग्रंथ लिहून त्या ग्रंथात आपल्या देशातील मोठ्या समूहाला दुय्यम स्थान दिले त्यांची सर्वांगीण दृष्टीने अवहेलना केली.त्यांना पशूपेक्षाही हीन दर्जाची वागणूक देण्याची व्यवस्था केली. हा धर्म नसून शिरजोरी आहे. अमाणूषतेची सजावटच आहे. म्हणूनच येथील संस्कृती धर्म आणि त्यांचे समर्थन करणारे धर्मग्रंथ कवी नाकारले आहेत. याचा प्रसार करण्यासाठी कवी नव्या युगातला प्रबोधनकार बनला आहे. 'मी नवा कीर्तनकार' या कवितेत या संस्कृतीतील खोटे देव व खोटे वाड्मय नाकारताना कवी म्हणतात जाळणार आहे वाड्मय गाठोडे होळीसमान

जाती व्यवस्थेचा

पुरस्कार करणारे

पायरीचा दगड

डोसक्यात घालून

परमेश्वराचे अवतार

करणार आहे दुभंग

गाणार आहे देवादिकांच्या विस्मृतीचा अभंग

पुराण वाड्मयाची होळी करणारा व देवादिकांच्या मूर्तीचे किर्तन करणारा हा कवी आंबेडकरी विचारांचा पाईक वाटतो. आंबेडकरी साहित्यातील सर्व कवींनी येथील वर्णव्यवस्था जातिभेद, देव,धर्म, संस्कृती, रूढी, परंपरा, स्वर्ग नरक नाकारले. तथागत बुद्धांनी अडीच हजार वर्षापूर्वी मानवाच्या कल्याणाचा मूलमंत्र सांगितला त्यात त्यांनी विज्ञानाला खूप महत्त्व दिले होते. हेच वैज्ञानिक सत्य कवीने प्रस्तुत करून सांगितले आहे या देशातील विषमताधिष्टीत समाजव्यवस्था बदलण्यासाठी कवी या व्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची मशाल घेऊन उभा आहे. हा विद्रोह व्यक्त करताना कवी 'जमणार नाही' या कवितेत लिहितात.

उपासपोटी झुकवून माना सामील होता येणार नाही मोडलेला

डाव आता

मांडता येणार नाही.

गोंदलेले घाव हृदयी

मांडता येणार नाही

ज्यांनी पिढ्यान् पिढ्या येथील अस्पृश्यांना छळले त्यांना उपाशी ठेवले.

पण यापुढे हे चालणार नाही. ती व्यवस्था कविला आता बदलायची आहे. त्यासाठी युगानुयुगांच्या छळांच्या व अपमानाच्या हृदयावर कोरलेल्या कथा कवींच्या सोबतीला आहेत. त्या सोबत घेऊनच कवीला नवे जग निर्माण करायचे आहे. त्यासाठी कवीचे मन सज्ज झाले आहे. ते 'इशारा' या कवितेत लिहितात

लढण्या सत्यासवे हे.

असत्य असते बाहेर आले तुम्ही गुलाम नाही

प्राणासमान लावा

प्राण पणास लावा

पाऊस खूप आला

ठिणग्या जपून ठेवा

अस्पृश्य माणसाला आपल्या अस्तित्वाची, स्वाभिमानाची व स्वत्वाची जाणीव करून देताना कवी बंडाचे निशाण हाती घेताना दिसतात. त्यांच्या मनात क्रांतीची ठिणगी पेटली आहे. ही क्रांती मशाल घेऊन समाजपरिवर्तनासाठी क्रांतीलढ्यास सज्ज असलेला कवी परिस्थितीने निराश होत

नाही किंवा मोडून पडत नाही. तर तो आशावादी आहे. कवीला क्रांती जवळ आहे असे वाटते .या क्रांतीमुळे निर्माण होणारे परिवर्तनही जवळ आहे. असे वाटते .म्हणून या क्रांतीतून निर्माण झालेला भविष्यकाळातील समाज कवीला परिवर्तनशील वाटतो. समाजाच्या भविष्याबद्दल लिहिताना कवी लिहितात .

मी भविष्यकाळ पाहतो सोडून गेलेल्या झाडात
उभा राहून
निष्प्राण घोड्याच्या
गारगोटी डोळ्यानं
भूतकाळाचे आणि वर्तमानाचे माझ्या स्वप्नावरील अतिक्रमण.

भूतकाळातील वेदनामय अपमानास्पद जगण्याचा वेध घेत घेत भूतकाळ आणि वर्तमान काळातील भविष्याचा वेध घेत पुढील भविष्यकाळ उज्वल घडविण्यासाठी कवीची ओढ आहे. झडून गेलेल्या झाडागत जीवनात आशेची पालवी फुटणार आहे .याचा विश्वास कवीला वाटतो. उद्याचा दिवस आपला आहे.

उद्याची क्रांती ही आपली आहे हा विश्वास व्यक्त करताना कवी आपल्या 'रानवेली' या दीर्घ कवितेत लिहितात

उद्या प्रसवेल क्रांती
नको भ्रांत बाई आज
जाईल हारकून सखा
चढविल नवा साज.

प्रस्तुत प्रतीकात्मक कवितेत निसर्ग प्रतीकांच्या माध्यमातून कवीने सामाजिक आशय प्रकट केला आहे. वर्तमान काळातील वेदनेची कवीला भ्रांत नाही.कारण उद्याच्या क्रांती विजयावर कवीची निष्ठा आहे. श्रद्धा आहे कवीची ही सकारात्मक भूमिका कवितेला वैचारिकतेचा सर्वोच्च पातळीवर घेऊन जाते.

कवींनी काही प्रेम कविताही लिहिल्या आहेत. पण या कवितांमधून शृंगारिकतेपेक्षाकिंवा प्रणयापेक्षा सामाजिक विषमतेचा व क्रांतीचाच आशय प्रकट झाला आहे. या विषम समाजव्यवस्थेत कवीचे प्रेमजीवनही करपून गेले आहे. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या सामाजिक-आर्थिक शोषणामुळे काळवंडून गेलेल्या कवीला प्रेम जीवनाचा सुखद अनुभवही घेता येत नाही. म्हणून कवी आपल्या कवितांमधून आपल्या प्रियेला क्रांतीचे तत्त्वज्ञान सांगत राहतो व तिला क्रांतीसाठी सज्ज करू पाहतो, तिला सामाजिक लढ्याची शिकवण देतो. 'माझ्या प्रिय पत्नीला उद्देशून' या कवितेत ते आपल्या पत्नीला प्रेमाऐवजी सामाजिक लढ्याची शिकवण देताना म्हणतात.

तेव्हा सखे...
आता मी हे सुरुंग पेरलेले यांच्या वाती तूच पेटवल्या पाहिजेस
या व्यवस्थेच्या
प्रत्येक गढीला
त्यांच्या प्राचीनत्वासह जमीनदोस्त करण्यासाठी

मराठी कवितेत चटकदार शृंगारिक प्रेमाची वर्णने केली गेली आहेत. वेलीत, फुले माळणाऱ्या पत्नीच्या हातात तथाकथित मराठी कवीने पतीच्या स्वागतासाठीही फुले दिले आहेत. पण आंबेडकरी कवितेतील पती हा या विषम व्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी व आपण पेरलेल्या सुरुंगाची वात पेटविण्यासाठी तिच्या हाती क्रांती मशाल देतो. ती पत्नीही या विषम व्यवस्थेतील सामाजिक अन्याय अत्याचाराने काळवंडून गेली आहे. मराठी कवितेला अपरिचित असलेले ही पती-पत्नीचे काळवंडलेपण कवी लहू कानडे यांनी अत्यंत दाहकपणे व्यक्त केले आहे. या विषमतेची ही गढी तिच्या प्राचीनत्वासह नष्ट करून समतेचे नवे जग कवीला निर्माण करायचे आहे. त्यासाठी ते आपल्या सहचारिणीला क्रांती लढ्यात उतरण्याची प्रेरणा देतात. कवीची सहचारिणी ही कवीची सामाजिक कार्यातीलही भागीदारीन आहे. म्हणून तिलाही सामाजिक कार्याची दिशा देताना 'माझ्या आठवणीसाठी' या कवितेत कवी लिहितात.

तू निराधार, तू निर्वासित तू तू योध्दी मुक्ती सेनेतील
तुझे पाय रस्ता झालेले
हात मशाल, शब्द क्रांतीगत

या समाजव्यवस्थेत जिच्या वाट्याला दारिद्रय आणि दैन्य मिळाले. म्हणून ती निराधार व निर्वासित आहे. येथे कवीचीही पत्नी या देशातील सर्वसामान्य अस्पृश्य माणसाचे प्रतिनिधित्व करताना दिसते. या सामान्य माणसासाठी ती योध्दी बनावी. तिचे पाय रस्ता व्हावे ,तिचे हात मशाल व्हावेत तर तिचे शब्द क्रांती व्हावेत म्हणजे येथे परिवर्तन होईल. या

क्रांती गर्भातून उदयाला आलेल्या सर्वांची ही कवीची पत्नी आई बनणार आहे. असा आपल्या पत्नी असलेल्या स्त्रीच्या मातृत्वाचेही दर्शन कवीने प्रस्तुत कवितेतून घडविले आहे 'विद्रोहाचे प्रेमगीत' या कवितेतही स्त्रीत्वाच्या या मातृत्वाची भावना व्यक्त केली आहे.प्रस्तुत कवितेत कवी आपल्या अर्धांगिनीला या देशातील मानवाच्या विषमतेला खतपाणी घालणाऱ्या रामायण-महाभारतातल्या व पुराण कथातील अनेक भाकड पुराणकथा सांगून आपल्या वेदनामयवास्तव जीवनाला या पुराण साहित्यात व महाकाव्यात आपल्या वेदनांना स्थान दिले नाही. उलट या देशातील या धर्मग्रंथाने सांगितलेल्या तिथी- नक्षत्रांनीच येथील अस्पृश्यांना दुर्लक्षितठेवले. त्यांच्या जीवनात दारिद्रय आणले.ही सर्व व्यवस्था बदलण्यासाठी कवी आपल्या पत्नीला आवाहन करताना म्हणतो.

तेव्हा सखे,
रागावू नकोस तुझ्या भागात क्रांतीला पेरतोय म्हणून
अगं कमीत कमी माणसं तरी येथील पोटाला
आईला आई म्हणणारी

या देशाची व्यवस्था बदलण्यासाठी कवी आपल्या पत्नीच्या मार्गात क्रांती पेरतो.म्हणजे तिला क्रांतीची चालना देतो आणि ही क्रांती या देशातील अमानुषतेला संवून नवी मानवतावादी मूल्याधिष्ठित समाज रचना निर्माण करण्यासाठी कवीला आवश्यक वाटते. जिथे आईला आई म्हटले जाईल. येथेही कवी आपल्या पत्नीचे रूपांतर चपखलपणे मातृत्वात करतो. संबंध मराठी कवितेत कवीचे हे कौशल्य अपरिचित व नावीन्यपूर्ण ठरणारे आहे. स्त्रीत्वाच्या मातृत्वाला जणू हे वंदनचा आहे .या नवमूल्यनामुळे लहू कानडे यांच्या कवितेला नवे परिणाम प्राप्त झालेआहे .आपल्या पत्नीबरोबरच आपल्या समाजबांधवांनाही ते विकासाची हाक देतात विकासाच्या या प्रवाहात शिक्षण घेऊन मानसन्मानाची जागा मिळण्यासाठी स्वतःला अस्पृश्य मानण्यात धन्यता मानणाऱ्या व चांभार या जातीचा पारंपारिक व्यवसाय स्वीकारणाऱ्या आपल्या समाज बांधवांमध्येही क्रांतीचे स्फुल्लिंग पेटविताना ते आपल्याकोंडू चाभार' या कवितेत म्हणतात.

आता फक्त तू
बदलले पाहिजेस
वाळीत टाकण्याच्या व्यवस्थेला पिंडदान
दिले पाहिजेस
तुझ्या स्वप्नांना वास्तवात आणली पाहिजेस
कोंडू चांभार तू खरच सुधारलं पाहिजेस

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या विकासासाठी सर्व मार्ग खुले केले. त्यांच्या शिष्यवृत्तीची आणि आरक्षणाची घटनादत्त तरतूद केली. संधीचा उपयोग करून घेऊन काही जण माऱ्याच्या जागावर गेले. तर काहीजणांनी अस्पृश्य म्हणून जगणे पसंत केले पर्यायाने ती प्रगतीपासून वंचित राहिले.अशा वंचितांना विकासाची दिशा दाखवणारे कवीचे हे चिंतन अशा अप्रगत अस्पृश्यांना अंतर्मुख करणारे आहे. चांभार समाजाचे प्रातिनिधीक रुपच आहे.

या देशातील अशा बहुसंख्य बहुजनांसाठी आहोरात्र कष्ट करणारे बाबासाहेब हे तर लहू कानडे यांच्या काव्य लेखनाचे प्रेरणास्त्रोतच आहे. बाबासाहेब अर्थात भीमराव आपल्या असामान्य कर्तृत्वाने संबंध विश्वात अजरामर ठरले या भीमरावांच्या क्रांतीचे सूत्र मांडताना कवीभीमराव तुही एक माणूस होतास' या कवितेत लिहितात

तू तथागताच्या ओठावर बिलसणारे चैतन्य
तू दरेक झोपडीतील
थंड चुलीगणित जाणारे अन्न तुम्ही एक माणूस होतास भीमराव

या देशातील प्रत्येक व्यक्तीला संविधानाच्या रूपाने न्याय हक्क बहाल करणारे बाबासाहेब एक व्यक्तीच होते. परंतु त्यांच्या अद्वितीय कार्यामुळे ते महापुरुष ठरले संबंध बहुजनाचे उध्दारकर्ते ठरले. नव कोटी लेकरांचे पिता ठरले. बाबासाहेबांनी बहुजनांच्या न्याय- हक्कासाठी प्रत्यक्ष क्रांती उभारली. ग्रंथ लेखनातून, वर्तमानपत्रातून बहुजनांना जागृत केले व आपल्या अस्पृश्य समाज बांधवांना मानवतावादी व विज्ञानवादी नवा धम्म दिला. त्यामुळे कोट्यवधी अस्पृश्यांच्या जीवनाचा कायापालट झाला. ते सुखी व वैभवशाली बनले. बाबासाहेबांच्या पुर्वी या नऊ कोटी दलितांसाठी कोणी माणूस झालाच नव्हता. माणसांना जिवंतपणे फाडणारे हे सर्व विषमतावादी व हिंस्त्र राक्षस होते. म्हणून कवीला आपल्या

विकसित विश्वातील पहिला माणूस बाबासाहेबांच्या रुपाने दिसतो.

प्रस्तुत काव्यसंग्रहात या सर्व उल्लेखनीय विषयांबरोबरच आपण समाजवादी होऊन समाजासाठी अविरत कार्य करणाऱ्या जयप्रकाश नारायण, नामांतर लढ्याच्या लढ्यात स्वतःला प्राणार्पण करणाऱ्या पोचीराम कांबळे यांच्याही क्रांतिकारक कार्याचे वर्णन करणाऱ्या कविता कवीने या काव्यसंग्रह लिहिल्या आहेत.

या समाजात उपेक्षित असलेल्या व टिचभर पोटासाठी देहविक्री करणाऱ्या वेशांच्या जीवनावरही त्यांनी लिहिलेली कविता वाचकांचे मन पिळवटून टाकणारी आहे आंबेडकरी विचार मुल्यांबरोबरच मार्क्सवादी मुल्येही या देशात रुजली पाहिजेत. अशी कवीची इच्छा आहे. या मार्क्सवादी विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी 'कॉम्रेड मी आलोय' ही महत्वपूर्ण कविता या कवितासंग्रहात समाविष्ट केली आहे. या बरोबरच सामाजिक समतेच्या लढ्याला साह्यभूत ठरणारे इतरही काही विषय कवींने या काव्यसंग्रहातून अत्यंत संवेदनशीलतेने हाताळले आहेत

आंबेडकरी कविताही मराठी कवितेची निळी पहाट ठरली आहे. परिवर्तनाचा व लढ्याचा ध्यास घेऊन क्रांती मूल्यांची पेरणी करणाऱ्या सर्व आंबेडकरी कवी शिलेदारांचे लहू कानडे हे मुकूटमणी ठरले आहेत. आंबेडकरी कवितेचे सर्व मूल्ये घटक स्वतःमध्ये पचवून त्यांना अत्यंत चिंतनगर्भतेने आविष्कृत करणे हे लहू कानडे यांनी आपल्या पहिल्यावहिल्या या काव्यसंग्रहातून केलेले कार्य आंबेडकरी कवितेसाठी मैलाचा दगड ठरणारे आहे. या काव्यसंग्रहात वापरलेली भाषा अस्पृश्य समाजातील युगानुयुगे वेदनेला जिवंतपणे साकार करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे साधी सोपी पण क्रांतीगर्भ भाषा ही या काव्यसंग्रहाला यशोशिखरावर घेऊन जाण्यासाठी उपयोगी ठरली आहे. कवींनी या काव्यसंग्रहासाठी निसर्ग व प्रतिमांचा व अनेक मिथकांचा केलेला वापर हा या काव्यसंग्रहातील अनेक कवितांना अर्थपूर्ण करणारा ठरला आहे.

आशय व अभिव्यक्तीचे उत्तम अभिनत्व या काव्यसंग्रहातून साधले आहे आंबेडकरी विचारातील परिवर्तनाच्या प्रवाहाला गती देण्यासाठी हा काव्यसंग्रह अत्यंत उपयुक्त ठरणार आहे यात कुठलेच दुमतच नाही.

**संदर्भग्रंथ**

1 ) लहू कानडे, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर. सुधारित चौथी आवृत्ती 2010 .
2) (संपा) डॉ.पद्माकर तामगाडगे, आंबेडकरी कविता, निर्मिती संवाद, कोल्हापूर. प्रथमावृत्ती, ऑक्टोबर 2014
3) डॉ. महेंद्र भवरे, दलित कवितेचे अर्धशतक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई. प्रथमावृत्ती 2018
4) म .सू .पाटील, दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र ,पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती 2010